# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सार्वजनिक आरोग्य खाते**

**क्षयरोग रुग्णालय समुह, शिवडी**

**क्र.काअआ/3806/क्षरुस(वआ) दि.18.07.2025**

**<u>स्वारस्य अभिव्यक्ती सूचना</u>**

विषय :- सार्वजनीक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समुह, शिवडी येथे रुग्णांना मानसेवी तत्वावर सेवा प्रदान करण्यासाठी इच्छुक तज्ञ डॉक्टरांकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविणे.

सार्वजनीक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समुह, शिवडी येथे मानसेवी शल्यचिकित्सक १ पद, मानसेवी सहाय्यक शल्यचिकित्सक २ पदे व मानसेवी विकृतीशास्त्रज्ञ १ पद निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी इच्छुक पात्र तज्ञ डॉक्टरांकडून खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव, मासिक मानधन व विहीत अटी आणि शर्तीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदाचा कार्यकालः दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७**
**(कंत्राटी तत्वावरदर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)**

| पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| मानसेवी शल्यचिकित्सक | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमएस/डीएनबी–शल्यचिकित्सा (MS/DNB-General Surgery) व MCH/DNB- Super specialty / फेलोशिप किवा तत्सम शैक्षणिक अर्हता विषय- Thoracic Surgery / CVTS | १. सदर शैक्षणिक अर्हतेनंतर ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी/महानगरपालिका/ मोठया खाजगी रुग्णालयात संबंधीत विषयात तज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |
| मानसेवी सहाय्यक शल्यचिकित्सक | २ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमएस/डीएनबी-शल्यचिकित्सा (MS/DNB-General Surgery)व MCH/DNB- Super specialty / फेलोशिप किवा तत्सम शैक्षणिक अर्हता<br><br>विषय- Thoracic Surgery / CVTS | १. सदर शैक्षणिक अर्हतेनंतर किमान १ वर्षाचा अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी/महानगरपालिका/ मोठया खाजगी रुग्णालयात संबंधीत विषयात तज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |
| मानसेवी विकृतीशास्त्रज्ञ | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमडी/डीएनबी- विकृतीशास्त्र विषयातील पदवृत्तर पदवी (MD/DNB in Pathology) | १. पदवृत्तर पदवीनंतर ८ वर्षापेक्षा जास्त अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी/महानगरपालिका/ मोठया खाजगी रुग्णालयात संबंधीत विषयात तज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |

★ **महत्त्वाच्या सूचनाः**

१) अधिक अनुभव व अर्हता असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

२) क्षयरोग रुग्णांचा उपचार करण्याचा अनुभव असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

३) उपरोल्लिखित अनुभव धारण केलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास क्षयरोग रुग्णालय येथिल रुग्ण सेवा सुरळीत चालविण्यासाठी अनुभवाची अट शिथील करण्यात येईल.

**अर्जप्रक्रिया :**

१) अर्जदाराने आपले अर्ज प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतीसहीत **दि.२१.०७.२०२५ ते दि.०१.०८.२०२५** पर्यंत सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) रुग्णालयाच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

२) अर्जदाराने कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क रू.७९०/- + १८% GST महानगरपालिकेच्या एफ साउथ, परळ येथिल नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

**प्रमाणपत्रे** : १) पदवी, पदवृत्तर पदवी व इतर शैक्षणिक प्रमाणपत्र व उत्तीर्ण गुणपत्रीका

२) वैध एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र, अतिरिक्त पात्रता नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण प्रमाणपत्र

३) अनुभव प्रमाणपत्र

४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत

५) प्रोफेशनल इंडेनमिटी (Professional Indemnity) प्रत

**वेतन** : परिपत्रक संचालक/वै.शि.प्र.रु./८२३३ दिनांक २५.०३.२०२४ नुसार दरमहा रु. १०,०००/.

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती-</u>**

१) सुट्टीचा दिवस आणि रविवार वगळता नियुक्त केलेल्या दिवसांनुसार मानसेवी तज्ञ यांनी आठवड्यातून ५ दिवस (४ तास) काम करावे लागेल.सुट्टीचा दिवस रुग्णालय प्रमुख ठरवतील.

२) नियुक्त मानसेवी सहाय्यक शल्यचिकित्सक व मानसेवी शल्यचिकित्सक क्षयरोग रुग्णालय समुह, शिवडी येथिल बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रियागार विभाग आणि आंतररुग्ण विभागात रुग्णांवर उपचार देतील. तसेच मानसेवी विकृतीशास्त्रज्ञ क्षयरोग रुग्णालय येथिल प्रयोगशाळेत सेवा देतील.

३) मानसेवी तज्ञ हे रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांना प्रशिक्षण देतील.

४) युनिट अंतर्गत होणारे सर्व उपचार व शस्त्रक्रिया यासाठी सर्वस्वी जबाबदारी मानसेवी तज्ञांची राहतील.

५) मानसेवी तज्ञ यांनी त्यांच्या कर्तव्याच्या दिवशी हजेरीपत्रावर स्वाक्षरी करावी लागेल.

६) मानधन शुल्काचे मानधन संचालक/वै.शि.प्र.रु./८२३३ दिनांक २५.०३.२०२४ च्या परिपत्रकानुसार केले जाईल.

७) मानसेवी तज्ञ यांना त्यांच्या सेवेच्या कालावधीत नैमित्तीक रजा अनूज्ञेय नाही.

८)मानसेवी तज्ञाची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन करण्यात येईल.

९) नियुक्त झालेला मानसेवी तज्ञ एकापेक्षा जास्त बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयाच्या पदांवर राहू शकत नाही.

१०) सदर पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.तसेच महानगरपालिका नियमित कर्मचा-यांना लागू होणारे बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमन लागू होणार नाहीत आणि त्यासाठी ते न्यायालयात जाऊ शकत नाहीत.

११) कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

१२) नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही

माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच कामगिरी असमाधानकारक आढळल्यास त्यांची नियुक्ती रद्दबातल करण्यात येईल.

१३) नियुक्तीच्या वेळी ५०० रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबातल करण्यात येईल.

१४) मानसेवी तज्ञला कुठल्याही कारणास्तव पदधारकास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

१४) नियुक्ती न झालेल्या पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी तयार करुन सदर प्रतिक्षायादी ३१.०३.२०२७ पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल व नियुक्त झालेला कंत्राटी मानसेवी तज्ञानी राजीनामा दिल्यास, सेवा सोडुन गेल्यास अथवा विहित वेळेत रुजु न झाल्यास प्रतिक्षायादीमध्ये उपलब्ध असलेल्या पुढील उमेदवारास नियुक्त करण्यास येईल.

**Sd/-**
**वैद्यकिय अधिक्षक**
**क्षयरोग रुग्णालय समुह**